**<u>अतित्वर्य/महत्वाचे</u>**

अति.महापालिका आयुक्त (ज) कार्यालय,
आस्थापना विभाग, पुणे मनपा.
जा.क्र. :-अतिमआ/साप्रवि/आस्था/ 6028
दिनांक :- 08/10/2024

**-: कार्यालयीन आदेश :-**

विषय :- पुणे महानगरपालिकेकडील कर आकारणी व कर संकलन विभागास अंदाजपत्रकातील दिलेली उद्दिष्टे व त्यानुषंगाने लेखनिकी संवर्गातील सेवक उपलब्ध करुन देणेबाबत.

पुणे महानगरपालिका प्रशासनाकडील लेखनिकी संवर्गातील सोबत जोडलेल्या परिशिष्ट मधील अ.क्र.१ ते २३ येथील सेवकांना कर आकारणी व कर संकलन विभागाकडे कामकाजासाठी कार्यमुक्त करण्यात येत आहे. अ.क्र.२४ ते ९३ येथील सेवकांची या आदेशानुसार कर आकारणी व कर संकलन विभागाकडे महसूल वाढीच्या दृष्टीने प्रशासकिय कामकाजाच्या सोयीसाठी कामाच्या अंतर्गत व्यवस्थेने तात्पुरत्या स्वरुपात नेमणूक करण्यात येत आहे.

सदर परिशिष्ट मधील सेवक यांना या कार्यालयीन आदेशाच्या दिनांकापासून प्रत्यक्ष कामासाठी कर आकारणी व कर संकलन विभागाकडे हजर होणेकरीता कार्यमुक्त करण्यात येत आहे. यासाठी स्वतंत्र कार्यमुक्ती आदेशाची आवश्यकता नाही.

सदर परिशिष्ट मधील सेवक कर आकारणी व कर संकलन विभागाकडे रुजू झाल्यानंतर त्यांचा रुजू अहवाल कर आकारणी व कर संकलन विभागाने सामान्य प्रशासन विभागाकडे सादर करावयाचा आहे.

सोबतच्या परिशिष्ट मधील अ.क्र.२४ ते ९३ येथील सेवकांची नियुक्ती कार्यालयीन आदेशाच्या दिनांकापासून पुढील आदेश होईपर्यंत करण्यात येत आहे.

वरील सेवकांचे महिनेमहा चे वेतन त्यांचे मुळ नेमणूक खात्याने आदा करावयाचे आहे.

तरी संबंधीत खातेप्रमुख यांनी पुढील योग्य ती तजवीज करावी .

Raut
**(रविंद्र बिनवडे)**
**अतिरिक्त महापालिका आयुक्त (ज)**
**पुणे महानगरपालिका**
8/10/2024

प्रत /-संबंधीत खातेप्रमुख/प्रशासन अधिकारी, पुणे महानगरपालिका
यांजकडेस माहिती व पुढील तजवीजीसाठी रवाना...